# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 25.04.2024** **वार: गुरुवार**

---

**अर्ज**

पुणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी आज शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मोहोळ यांच्या प्रचारासाठी कोथरूडच्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून खंडोजी बाबा चौकापर्यंत आज पदयात्रा काढण्यात आली होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी झाले होते.

शिरूर लोकसभा मतदार संघातले महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करत आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**जाहीर नामा**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आज सकाळी पक्षाचे संस्थापक शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. राज्यसभा खासदार वंदना चव्हाण, ज्येष्ठ नेते जयंत पाटील यावेळी उपस्थित होते. स्वयंपाकाचा गॅस दर पाचशे रुपयांपर्यंत करणे, नोकऱ्यांमधील वीस लाख सरकारी रिक्त जागा भरणे, वस्तू आणि सेवा कर प्रणालीत राज्याचा सहभाग वाढवून केंद्र हस्तक्षेप मर्यादित करणे, शेतकऱ्यासाठी कर्जमाफी, यासह सत्तेत आल्यावर राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा समावेश या जाहीरनाम्यात असल्याची माहिती पाटील यांनी यावेळी दिली.

**शिक्षक नियुक्ती**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत पुण्यात प्रथमच सरकारी शाळांबरोबरच खासगी शिक्षण संस्थांमधील काही शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त करण्यात आलं आहे. मुंबई उच्च न्यायालयानं देखील या निर्णयाला पाठिंबा देत खासगी शिक्षण संस्थांमधील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निवडणूक कामासाठी जिल्हा प्रशासनाला सहकार्य करण्याची सूचना केली आहे. सध्या जिल्ह्यातील सुमारे १६२८ सरकारी कर्मचाऱ्यांना निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलं असून आवश्यकतेनुसार आणखी कर्मचारी नियुक्त केले जातील असं प्रशासनानं म्हटलं आहे.

**एएफएमसी**

सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालय अर्थात एएफएमसीच्या ५८व्या तुकडीचा दीक्षांत संचलन समारंभ आज झाला. १४० विद्यार्थ्यांनी यात शानदार संचलन केलं. यामध्ये पाच परदेशी विद्यार्थी तसंच २५ विद्यार्थिनींचा सहभाग होता. एएफएमसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल दलजितसिंह यांनी संचलनाची पाहणी केली आणि मानवंदना स्वीकारली.

**नाले स्वच्छता**

पुणे शहरातील नालेस्वच्छतेच्या कामाची आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले आणि अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी आज पाहणी केली. नाले स्वच्छतेची कामे 15 मे पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले.

**रक्तदान शिबिर**

पुण्यातील संत निरंकारी सत्संग भवन गंगाधाम इथ आयोजित रक्तदान शिबिरात ७९४ पिशव्या रक्त संकलन झाल्याची माहिती पुणे विभागाचे प्रभारी ताराचंद करमचंदानी यांनी दिली. मानव एकता दिनानिमित्त हे शिबिर आयोजित करण्यात आलं होतं.

**पाणी टंचाई**

पुण्यातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर शहर आणि परिसरातील मोठ्या गृहनिर्माण संस्थांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची तपासणी करण्याचा निर्णय राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळानं घेतला आहे. या प्रकल्पाद्वारे प्रक्रिया केलेलं पाणी या संस्थांमधील फ्लश साठी, झाडांसाठी आणि अन्य किरकोळ कामांसाठी वापरलं जाणं अपेक्षित असताना अनेक सोसायट्यांमधून हे प्रकल्प कार्यरत नसल्याच्या तक्रारी आल्यानं ही तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात या तपासणीत दोषी आढळणाऱ्या गृहनिर्माण संस्थांवर कारवाई केली जाणार आहे.

**पाणीचोरी**

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा खडकवासला धरण प्रकल्पात उपलब्ध असलेला मर्यादित जलसाठा आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कालव्यातून होणारी पाण्याची चोरी लक्षात घेता खडकवासला धरण उजव्या कालव्याच्या परिसरात जिल्हा प्रशासनाकडून जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. या आदेशानंतर इंदापूर तालुक्यातील तिघा शेतकऱ्यांना कालव्यातून बेकायदा पाणी उपसा केल्याबद्दल अटक करण्यात आली आहे .

**तिकीट दरवाढ-**

उन्हाळ्याच्या सुटीत पर्यटनासाठी प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता यंदा पुण्यातील ट्रॅव्हल्स चालकांनी तिकीटदरात दुप्पट वाढ केली आहे. पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने ट्रॅव्हल्स संघटनाना नियमाप्रमाणे तिकीटाची आकारणी करण्याचे आदेश दिले आहेत. जास्त दराची आकारणी झाल्याचा अनुभव आल्यास प्रवाशांनी ‘आरटीओ’कडे तक्रार करावी. असे आवाहन प्रभारी पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी केले आहे.

**क्रिकेट-सीमा-लौकिका**

पुण्यात सुरू असलेल्या कॅप्टन शिवरामपंत दामले करंडक’ १२ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत एसएआरके ॲकॅडमीने साई क्रिकेट ॲकॅडमीचा ९ गडी राखून सहज पराभव केला. यासह एसएआरके ॲकॅडमी, टेंभेकर फार्म्स ॲकॅडमी, पुणे क्रिकेट ॲकॅडमी, या संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

**हवामान**

पुणे शहरात आज कमाल तापमान 38 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस तर किमान 22 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**